१४ व्या केंद्रिय वित्त आयोगातर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१७ -१८ ते सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या परफॉर्मन्स ग्रँटच्या वितरणाबाबतचे निकष व सनियंत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः चौविआ २०१५/ प्र.क्र.२६ /वित्त-४

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दिनांक -३ नोव्हेंबर,२०१७

वाचा :-

१) केंद्रीय वित्त मंत्रालयाचे पत्र क्र.एफएफसी/एफसीडी/२०१५-१६,दि. ८/१०/२०१५

२) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. चौविआ २०१५/ प्र.क्र.२६/ वित्त-४, दि.१६/०७/२०१५

३) शासन परिपत्रक,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. चौविआ २०१५/ प्र.क्र.१०७/ वित्त-४, दि. १/२/२०१६

४) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. चौविआ २०१५/ प्र.क्र.२६/ वित्त-४, दि. २८/०४/२०१६ व दि. २५/१/२०१७

५) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. चौविआ २०१५/ प्र.क्र.२६/ वित्त-४, दि. १४/०६/२०१७

६) केंद्रीय पंचायत राज मंत्रालयाचे पत्र क्र.एन-११०११/४/२०१७-एफडी, दि. २९/९/२०१७

प्रस्तावना: -

चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या बळकटीकरणासाठी राज्याला सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षासाठी बेसिक ग्रँटचे रु.१३५३२.११ कोटी व परफॉर्मन्स ग्रॅटचे रू.१५०३.५६ कोटी अशा दोन प्रकारच्या ग्रँटसच्या स्वरुपात एकूण रु.१५०३५.६७ कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. प्रस्तुत निधी हा केवळ ग्रामपंचायत स्तरासाठीच उपलब्ध करण्यात येणार आहे.

चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्यानिक स्वराज्य संस्थांना सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षाच्या जनरल परफॉर्मन्स ग्रँटच्या वितरणाबाबतचे निकष संदर्भाधीन क्र.५ येथील

दि.१४/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि पंचायत राज मंत्रालयाने दि.२९/०९/२०१७ च्या पत्रान्वये चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१७ -१८ ते सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या परफॉर्मन्स ग्रँटच्या वितरणाबाबतचे निकष व संनियत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना कळविल्या आहेत. पंचायत राज मंत्रालयाने दिलेल्या सूचनानुसार परफॉर्मन्स ग्रँट वितरणाच्या सुधारीत सुचना निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार दिनांक १४/६/२०१७ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

चौदाव्या केद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त होणा-या परफॉर्मन्स ग्रॅटच्या अनुदानाच्या वितरणाची व संनियंत्रणाची सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या अर्थिक वर्षाकरीता कार्य पध्दती खालील प्रमाणे असेल.

अनु क्र.	अनिवार्य निकष	गुण
१.	ग्रामपंचायतींनी त्यांचे लेखे ठेवणे आवश्यक असून त्यांचे अद्यायावत (दोन वर्षाच्या आतील कालावधीचे) लेखा परीक्षण करुन ते सादर झालेले असावेत.	अनिवार्य
२.	लेखापरिक्षित लेख्यांवरुन ग्रामपचांयतीच्या स्वउत्पन्नात मागील वर्षापेक्षा वाढ झालेली असावी.	अनिवार्य
३.	परफॉर्मन्स ग्रॅट वितरणाच्या वर्षाच्या ग्राम पंचायत विकास आराखडा पूर्ण करुन तो प्लान प्लस पोर्टलवर अपलोड झालेला असावा.	अनिवार्य
४.	चौदाव्या वित्त आयोगा अतंर्गत मागीलवर्षी पात्र परफॉर्मन्स ग्रॅट मधून करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील क्षेत्र निहाय केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाच्या वेबसाईटवर दर्शवावा.	अनिवार्य

२. उपरोक्त निकषांची पुर्तता करणा-या ग्रामपंचायती मुल्यांकन पुढील प्रमाणे करण्यात येईल.

	निकष (वर्ष म्हणजे आर्थिक वर्ष)	गुण
I	स्वउत्पन्नात प्रमाणित वाढ	गुण
	> ० ते १०%	०५
	>१० ते २५%	१०
	>२५ ते ५०%	१५
	>५० %	२०
II	प्रमाणित लेख्यांनुसार मागील वर्षी चौदाव्या वित्त आयोगाअंतर्गत पात्र बेसिक ग्रॅटच्या प्रमाणात स्वउत्पन्नाची टक्केवारी.	गुण
	> ० ते १०%	१५
	>१० ते २०%	२०
	>२० ते ३०%	३०
	>३० %	४०
III	मागील आर्थिक वर्षात हागणदारी मुक्त झालेली ग्रामपंचायत होय नाही	 ३० ०
IV	मागील आर्थिक वर्षात ग्रामपंचायती मध्ये करण्यात आलेले लसीकरण. पुर्ण लसीकरण(०-२ वयाची बालके)	
	होय नाही	१० ०
v	एकूण अधिकतम गुण (i + ii + iii + iv)	१००

या वर्षी असणारी हागणदारी मुक्त प्रमाणस्थापित ग्रामपंचायत ही पुढील वर्षासाठी हागणदारी मुक्त असेल हा निकष लावण्यात येणार आहे.

३. खालील तक्त्यानुसार ग्रामपंचायतीनां परफॉर्मन्स ग्रँटचे वाटप हे त्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यात येईल

गुण	परफॉर्मन्स ग्रॅटची अनुज्ञेय रक्कम
४९ पर्यत	मंजुर निधीच्या ५० %
५० ते ६०	मंजुर निधीच्या ७० %
६१ ते ७०	मंजुर निधीच्या ८० %
७१ पेक्षा जास्त	मंजुर निधीच्या १०० %

*मंजुर निधी म्हणजे लोकसंख्या व क्षेत्रफळाच्या आधारे येणारी अनुज्ञेय रक्कम.

४. उपरोक्त वाटपानंतरही अपात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीच्या निधीसह व निकषानुसार वाटप झाल्यानंतर शिल्लक निधीचे पुर्नवितरण, ज्या ग्रामपचांयतीनी उपरोक्त अनुक्रमांक ३ मधील निकषानुसार सरासरी ५०% किंवा जास्त गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींना प्राप्त गुणांच्या एकूणच महत्वाच्या प्रमाणात करावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०३१२४२५४४९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d9af780863a29e5ba66bbc39e6f9c1e31d9d4bbd5f5159dee9c14cf33ac34321, cn=Narayan Bhaskar Ringane
Date: 2017.11.03 14:55:45 +05'30'

(ना.भा.रिंगणे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.

मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
मा.सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त.(महसूल)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उपसचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय / वित्त आयोग कक्ष.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग (सर्व कार्यासने)
निवड नस्ती का.क्र.वित्त-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२